International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.3 Jan-Feb 2025

# बंजारा जातीचे सामाजिक परिवर्तन एक अभ्यास

**जीवन खुशालराव शिंदे[1], डॉ. धनवडे एस. व्ही.[2]**
[1]संशोधक मार्गदर्शक
[2]सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा रा ती म विद्यापीठ, नांदेड
**Corresponding Author: जीवन खुशालराव शिंदे**
**DOI- 10.5281/zenodo.14992284**

**सारांश:**

आदिवासी समुदायाप्रमाणे बंजारा ही एक जमात आहे. या समाजातील लोक गुरुनानक यांना मोलाचे स्थान देतात. संत सेवालाल महाराज किंवा सेवाभाया हे बंजारा समाजातील लोकांचे महत्त्वाचे संत आहेत. पोहरादेवी हे त्यांचे आराध्य दैवत मानले जाते. समाजातील लोक बालाजी आणि जगदंबा सारख्या देवतांची पूजा करतात. सोबतच बंजारा समाजातील लोक बालाजी आणि जगदंबा सारख्या देवतांची पूजा करतात.19 व्या शतकातील ब्रिटिश शासन वसाहतवादी प्रशासन बंजारा समाजातील कथांना विस्तृत रूप देण्याचे प्रयत्न करतात. शिवाय या काळात शिव राठोड या नावाने प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाची ओळख सांगितली जाते. लमान किंवा लमानी या नावाने देखील परिचित असणारी ही जमात आहे खेडे वस्ती तांडे पाडे इत्यादी ठिकाणी वसाहत निर्माण करून स्थायिक होताना हा समाज दिसतो परंतु 2024 च्या विधानसभेत या समाजाचे नेतृत्व करणारे तीन विधानसभा मतदारसंघ यातून तीन उमेदवार विजयी होऊन सदरील समाजाचे नेतृत्व करताना व विधानसभेत आवाज उठवताना दिसतात.

सध्याच्या राज्य सरकारमध्ये एक मंत्रीपद देखील या समाजाच्या वाट्याला मिळाले आहे. या समाजाचा 'पाडवा' हा सर्वात मोठा सण असतो तर होळी, दिवाळी, दसरा इतर अनेक सण व उत्सवाचे महत्त्व वेगळया अंदाजात किंवा प्रमाणात साजरा करताना आढळतो. देवाची पूजा करताना, सण उत्सव वेळी गीत गाताना, विवाह समारंभात मंगलाष्टके गाताना बंजारा/लमानी भाषेचा वापर करताना आढळून येतात. बंजारा समाजातील किंवा समाजाबद्दल अनेक संशोधने समोर आली आहेत. शिवाय या समाजाला 3000 वर्षांचा इतिहास असल्याचा दावा केला जातो. यातीलच गोर समाज हा अलीकडच्या काळात विकसित होताना दिसत आहे. गोर समाजातील लोक सहसा स्वतःला बंजारा आणि बाहेरी लोकांना 'कोर' संबोधतात गोरमती किंवा गोरमाती असा एक संबंधित वापर आहे ज्याचा अर्थ स्वतःचे लोक असा केला जातो.

या समाजाचा मराठवाड्यातील नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली या चार जिल्ह्यापुरता विचार केल्यास यांना लमानी व बंजारी या दोनच नावाने ओळखले जाते. परंतु ग्रामीण भागात लमानी आणि गोरमाटी या नावाने देखील हाक दिली जाते. शिवाय ऋतुमानानुसार यांच्या सणाचे महत्त्व ठरलेले असते. मार्च महिन्यात उन्हाचा पारा चढलेला असताना होळीच्या सणाचे महत्त्व यांच्यात वेगळया प्रकारचे आहे. तांड्यावर राहणारा हा समाज जवळ असणाऱ्या गावात पाटील, पांडे, देशमुख यांच्या घरी जाऊन गीताचे प्रदर्शन करून गावातील लोकांचे मनोरंजन करतात व सण साजरे करतात. 15 ते 20 लमानी बांधव किंवा लोकांचा समूह गावात जाऊन रंग खेळतात, बोंबलतात व आपल्या देवताकडे गावाच्या खुशालीची मागणी करतात. त्यांच्या मोबदल्यात काही लोक त्यांना पुरणपोळीचे जेवण तर काही अन्नधान्य, पैसे, बक्षिसे व सावकार त्यांना पैसे इत्यादीच्या स्वरूपात मोबदला देतात. ग्रामीण व शहरी भागातील यांचे जीवन वेगळया प्रकारचे आहे आणि 21व्या शतकात तर हा समाज अतिशय प्रगत झाल्याचे चित्र समाजात दिसत आहे.

**मुख्य संज्ञा** :बंजारा, लमानी, समाज, परिवर्तन, अभ्यास इत्यादी.

**प्रस्तावना :**

फक्त नांदेड, मराठवाडा, महाराष्ट्र एवढ्या पुरताच विचार न करता हा समाज देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेला आहे याची प्रचिती मिळते. नोकरीच्या सर्वच क्षेत्रात चांगली कामगिरी करताना आढळतो. देशाच्या वेगवेगळ्या भागात हा समाज पसरलेला आहे आणि हा समाज वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातेज्यामध्ये गोर ., गोर बंजारा, बल्लाडिया, गोर राजपूत, राजपूत बंजारा, लाडानिया, लबाना, नायक इत्यादी नावाने ओळखले जाते. या समाजाने अनेक भाषांचा स्वीकार केलेला

आहे. बंजारा समाज संपूर्ण भारतामध्ये सामावलेला आहे. कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश व इतर अनेक राज्यात हा समाज पसरलेला आहे. कामाच्या निमित्ताने महाराष्ट्र सोडून तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश इत्यादी जवळच्या राज्यात जाऊन स्थायिक झाले. जुन्या काळात कामानिमित्त जाऊन तेथेच कार्य चांगले व कमाई चांगले असल्याने स्थायिक झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. शिवाय या समाजातील अनेक लोक परदेशात स्थित असल्याचेही उदाहरणे आहेत. कर्नाटकात बंजारा हे नाव बदलून बनीजागारु असे नामकरण करण्यात आले आहे. 1968 मध्ये' अखिल भारतीय बंजारा सेवा संघ' या संघटनेने सर्वेक्षण केले व या सर्वेक्षणात 27 समानार्थी शब्द आणि 17 उपसमूह नोंदवले गेले आहेत. बंजारा समाजाचे हित लक्षात घेऊन व कल्याण करण्याच्या इराद्याने अनेक संघटना, संस्था सध्याच्या कालखंडामध्ये कार्यान्वित आहेत.

**संशोधनाची पार्श्वभूमी :**

अनेक संशोधनात या समाजाच्या बाबतीत विविध प्रकारचे उल्लेख आढळतात. त्यापैकी लेखक जे जे रॉय बर्मन यांनी उल्लेख केल्याप्रमाणे, बंजारा राजस्थान आणि भारताच्या इतर भागात स्थायिक झाले आहेत तर त्यांना भोपा कडबा आणि कालबेलिया यांच्यासह त्यांना भारतातील जिप्सी असे म्हटले जाते. डी. बी. नाईक यांच्या मतानुसार रोमा जिप्सी आणि बंजारा लंबानीमध्ये खूप सांस्कृतिक साम्य आहे. लेखक बि जी हलवर यांनी या समाजाबद्दल असे उद्गार काढले आहेत की, बहुतेक भटक्या समुदायांचा असा विश्वास आहे की ते राजपूत वंशाचे आहेत. त्यांचा दावा आहे की मुघल साम्राज्य असताना त्यांच्यावर हल्ला झाला तर ते माघार घेत असत व परकीय, मुघल साम्राज्य याचा प्रभाव कमी झाल्यावर किंवा ते गेल्यावरच परत येण्याची प्रतिज्ञा करत होते. विविध लेखक व तज्ञ मंडळीचे अनेक मतांचा प्रवाह या समाजाच्या बाबतीत वेगवेगळया प्रकारचा आहे. परंतु आजही या समाजातील घटकांमध्ये वेगळया प्रकारची ताकद व सामर्थ्य असल्याचे दिसून येते. 40°c तापमान असताना काही लोकांना एसीमध्ये राहून जीव कासावीस होतो तर बंजारा समाजातील लोक तांड्यावर, पाड्यावर वस्तीवर व इतर माळरानात अगदी गुण्यागोविंदाने राहताना आपण पाहतो. शिवाय अनेक सोयी सुविधा पासून वंचित असणारा हा समाज चार ते पाच किलोमीटर दूर अंतरावर पायी पायपीट करून हंडाभर पाणी मिळवण्यासाठी झगडत असतो. स्वातंत्र्यानंतरही बंजारा समाजाची स्थिती ही उल्लेखनीय आहे कारण या काळात देखील त्यांना खऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता आलेला नाही. या काळामध्ये पक्के रस्ते, पक्के घर, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, आरोग्याच्या सोयी, शिक्षण व्यवस्था यापासून वंचित राहिलेला हा घटक अलीकडच्या काळामध्ये अतिशय प्रगल्भ प्रगती करताना दिसून येत आहे.

**संशोधन कार्यपद्धती :**

वर्तमानकालीन बंजारा समाजाची परिवर्तनाच्या दिशाचे मूल्यमापन करण्यासाठी वर्णनात्मक व सर्वेक्षण या मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. एखाद्या समुदायाचे वर्णन व सर्वेक्षण करण्यासाठी आणि वर्तमान अभ्यास करण्यासाठी या पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाचा शोध घेणे.
2. बंजारा समाजातील लोकांचे दैनंदिन जीवनाचा अभ्यास करणे.
3. बंजारा समाजातील लोकांच्या संस्कृतीचा अभ्यास करणे.
4. बंजारा समाजातील लोकांच्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

**बंजारा समाजाचा शोध :**

सदरील संशोधन पद्धतीसाठी बंजारा समाजाच्या सामाजिक परिवर्तनाचा इतिहास अभ्यासण्यासाठी मुख्यतः नांदेड जिल्हा संदर्भात असलेल्या या घटकाच्या माहितीनुसार नांदेड जिल्ह्यातील आकडेवारी पाहता ती खालीलप्रमाणे आहे-

| **नांदेड जिल्हा** | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या- 3771000 | |
| हिंदू | 74.7% |
| मुस्लिम | 13.7% |
| बौद्ध | 10.6% |
| शिख | 0.4% |
| ख्रिश्चन | 0.1% |
| इतर | 0.5%. |

बंजारा (हिंदू) 80 हजार (लंबाडी/लमानी) बंजारा राठोड (हिंदू) 6800.

उद्दिष्ट क्रमांक एकच्या पूर्ततेसाठी संशोधकांनी संशोधन केल्याप्रमाणे नांदेड जिल्ह्यात बंजारा समाजाचे दोन लोकसमूह निदर्शनास येतात त्यापैकी बंजारा (हिंदू) 80 हजार (लंबाडी/लमानी) व बंजारा राठोड (हिंदू) 6800 अशी होती त्यांची एकूण लोकसंख्या 86 हजार 800 एवढी आढळली (संदर्भ जोशवु प्रकल्प).

उद्दिष्ट क्रमांक दोनच्या पूर्ततेसाठी संशोधकांनी केलेल्या संशोधनानुसार बंजारा हे ऐतिहासिकदृष्ट्या

भारताच्या आतील भागात पशुपालक, व्यापारी, प्रजनन करणारे आणि मालाचे वाहतूक करणारे उद्योजक होते. त्यांच्या या दैनंदिन कार्याच्या कमाईवर त्यांची उदरनिर्वाह चालत असे. या कामाच्या उपयोगासाठी बैलगाडी, घोडागाडी, मालगाडी, होडी, उंट, बैल, गाढव व दुर्मिळ प्रमाणात घोडे वापरत असत. वाहतुकीवर व्यापार अवलंबून असल्याने मागच्या काळात वाहतुकीचा भाग या समाजातील लोकांवर अवलंबून होता त्यामुळे व्यापार आणि अर्थव्यवस्थेचा मोठा भाग हा समाज नियंत्रित करत होता. अलीकडच्या काळात बाजारपेठ असलेल्या शहर, तालुका किंवा जिल्हा किंवा गावाच्या ठिकाणी माल वाहण्याची कामे चारचाकी मालवाहतुकीच्या गाड्या, हातगाडी किंवा इतर प्रकारचे कष्टाची कामे करताना हा समाज व समाजातील लोक दिसतात. तसेच काही ठिकाणी कामाचा ताणतणाव कमी व्हावा म्हणून काही शोक करताना आढळतात किंवा व्यसन करताना आढळतात तर काही तांड्यावर मद्यविक्री करताना आढळतातया समाजातील . लोक अतिशय कष्टाची, मेहनतीची कामे करतात परंतु त्याचा योग्य मोबदला त्यांना मिळाला नसल्यामुळे हा समाज आजही थोडासा पाठीमागे राहिल्याचे दिसून येतो. परंतु यातील मोजके लोक शिक्षणाचा फायदा घेऊन व या समाजासाठी किंवा जमातीसाठी असलेल्या शासन स्तरावरच्या सुविधांचा फायदा घेऊन पुढे गेले आहेत व बराचसा भाग किंवा बराचसा समाज आजही पाठीमागे असल्याचे निदर्शनास येते.

उद्दिष्ट क्रमांक तीनच्या पूर्ततेसाठी संशोधन करताना या समाजातील संस्कृती उत्कृष्ट आहे, उदरनिर्वाहाची साधने अवघड आहेत परंतु जास्त कष्ट करण्याचे व मेहनत करण्याचे कार्य जणू यांच्या पाचवीला पूजल्यासारखे कष्ट करतात व आपल्या संस्कृतीचे जतन करतात. होळीचा रंग खेळण्यासाठी कोणत्याही रसायनाचा वापर न करता तांड्यावर असलेल्या पळसाच्या फुलांचा वापर करून रंग तयार करतात. बंजारा नृत्य आणि संगीत यासारख्या कलाकृती सोबतच रांगोळी, कापड भरतकाम, मातीच्या वस्तू, चित्रकला, बांबूचे वस्तू, टाकाऊ पासून टिकाऊ, प्लास्टिक कला इत्यादींचा समावेश होतो.

उद्दिष्ट क्रमांक चारच्या पूर्ततेसाठी अभ्यास करताना संशोधकास आढळले की, बंजारा संस्कृती प्राचीन काळापासून उदयास आलेली आहे व हा एक वेगळा लोकसमूह आहे. यांच्यातील वेशभूषा, केशभूषा, बोलीभाषा नृत्य व संगीत कला आणि मनोरंजन, सर्व उत्सव, धर्मविषयक शिकवण आणि सदाचार, समाज आणि समाजातील प्रथा व परंपरा, वैवाहिक नियम व पद्धती, लिंग विषयक विचार प्रवाह इत्यादीच्या बाबतीत बंजारा समाजाने आपली वेगळी छटा निर्माण केली आहे व आपली स्वतःची संस्कृती जीवित ठेवली आहे. बंजारा हे पारंपारिक पणे स्थलांतरित लोक असले तरी सध्याच्या काळात नियमित समाज व सांस्कृतिकप्रमाणे दैनंदिन व्यवहार करताना आढळत आहेत. पक्की घरे, दळणवळणाची सोय व साधने, पेहराव, वेशभूषा व इतर अनेक बाबतीत इतर संस्कृती प्रमाणे व्यवहार करताना आढळतात. व्यापार, शिक्षण या गोष्टीमुळे हा समाज अलीकडच्या कालावधीमध्ये प्रगत होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील बंजारा समाज हा एक पत्नीत्वाचा समावेश असलेल्या विवाह पद्धतीचे पालन करतात, विधवांना पुनर्विवाह करण्याची परवानगी दिली जाते व घटस्फोट स्वीकारला जातो. त्यामुळे 1990 च्या वेळी दळणवळण व वाहतुकीच्या सोयी नसल्याने किंवा कमी प्रमाणात असल्याने फार तर एकाच तांड्यात किंवा आजूबाजूच्या तांड्यात किंवा तालुक्यातच विवाहासाठी वधू वर शोधले जात होते. परंतु आजच्या काळात शिक्षणामुळे प्रगती झाली आणि जिल्हा सोडून विवाह करण्याचे प्रथा सध्याच्या काळात आली आहे व जिल्हा सोडून विवाह करून मुलगी किंवा मुलगा जाऊन राहत असल्याचे चित्र अलीकडे दिसत आहे. किंबहुना कार्यामुळे, नोकरीसाठी, व्यापारासाठी जिल्हा सोडून वास्तव्य करताना वधू वर दिसत आहेत. एकंदरीतच पुरातन काळातील संस्कृती सोडून आज प्रगत संस्कृतीचा विचार करून किंवा आजूबाजूला राहत असलेल्या लोकांच्या संस्कृतीच्या नियमाप्रमाणे उपयुक्त असलेले आणि आवश्यक असणारे बदल बंजारा समाजातील लोकांमध्ये होताना दिसत आहेत त्यामुळे इतर समाजातील लोकांच्या घराप्रमाणे घर गाडी प्रमाणे गाडी वेशभूषेप्रमाणे वेशभूषा व इतर प्रकारची आवश्यक बाबतीतील बदल या समाजात घडताना दिसून येत आहेत.

**निष्कर्ष** :

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेता नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या लोकांच्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना संशोधकांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष मांडले –

1. 1990 ते 2010 हा काळ सदर समाजातील लोकांच्या सामाजिक परिवर्तनाचा बदल घडवून आणणारा ठरलेला आहे.
2. वेशभूषेसाठी व संगीतासाठी आजही हा समाज इतर समाजात आपले स्थान टिकवून ठेवलेला आहे.
3. नृत्य आणि संगीत यांच्या बाबतीत स्वतःचा कला प्रदर्शित करण्याची वेगळी छबी या समाजात आहे.
4. कष्टाचे व मेहनतीचे कार्य करण्याची क्षमता या समाजातील पुरुष व स्त्रिया यांच्यामध्ये आहे.
5. बंजारा समाजातील लोक लिंगभेद करत नाहीत किंवा लिंगभेद करून वागणूक देत नाहीत कारण विवाह झाल्यानंतर मुलगा आपल्या पत्नीसोबत वेगळ्या संसार मांडत असेल तर स्वतःची मुलगी व घर जावई यांच्याकडून वृद्धावस्थेतील जीवनाचे सोय केल्याचे निदर्शनास आले आहेत.
6. मुलींना सुद्धा तितकेच महत्त्वाचे स्थान आज या समाजात दिले जाते व त्यांना लग्नापूर्वीच सर्व कामे शिकवून आई त्यांना चांगले प्रशिक्षित करते मुलगी लग्नापूर्वी त्यांना त्यांच्या कामात मदत करते त्यामुळे तिला सर्व कामे येतात आणि आर्थिक सहकार्य देखील

ती करते त्याचा फायदा तिला तिच्या वैवाहिक जीवनात होत असल्याचे निदर्शनास आले.

7. वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षक वकील व्यापारी इतर क्षेत्रात या समाजाचे योगदान भरभरून दिलेले आहे. या समाजात पूर्वीच्या काळात बालविवाहाची प्रथा होती परंतु सध्याच्या काळात त्याचा रिमोट झाल्याचे निदर्शनास आले आणि ही बाब चांगली आहे.
8. शिक्षणाकडे सर्वांनी दिशा ओढवली आहे त्यामुळे शासनाच्या आपल्या जमातीसाठी कोणत्या सोयी सुविधा आहेत याचा फायदा घेताना दिसत आहेत.
9. नांदेड जिल्ह्यात 90% तांडे व वस्तींना पक्के घर पक्का रस्ता पाणीपुरवठा वीज शाळा शिक्षण आरोग्य इत्यादी बाबती समृद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.
10. आमदार खासदार मंत्री या पदापट थोफाट बँकिंग लिपिक रेल्वे आरोग्य शिक्षक व्यापार या क्षेत्रातही मोलाची कामगिरी करताना हा समाज दिसतो आहे.

**संदर्भग्रंथसूची:**


1. *J. J. Roy Burman* (2010), Ethnography of a Denotified Tribe: The Laman Banjara, Mittal Publication.
2. *Bhukya, Bhangya* (2010), Subjugated Nomads : The Lambadas under rule of the Nizams, Orient Black Swan.
3. *Naik Dhansing B* (2000), The art and Literature of Banjara Lambanis : A socio – cultural studies, Abhinav Publication.
4. बंजारा समाज आणि संस्कृती : *श्री पवार जी एच*
5. लोकनृत्य व संगीत (बंजारा)
6. हिंदू संस्कृती ( बंजारा )
7. बंजारा संस्कृतीच्या परिवर्तांचा महामेरू : संत सेवालाल महाराज.